टि/१

म.वि.स./ड-३(समिति समन्वय)

**विषय :- राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूक आचारसंहितेच्या काळात विधानमंडळाच्या बैठका घेण्याबाबतची कार्यपद्धती.....**

पृष्ठ क्र.प/१ ते प/७ वरील उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे पत्र कृपया पहावे.

उपरोक्त पत्रान्वये मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून इतर सर्व जिल्ह्यातील ग्रामपंचयातींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी आचारसंहिता अंमलात आली आहे आणि ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून इतर सर्व जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणूका होत असल्याने उक्त जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत विधानमंडळाच्या समित्यांनी बैठका/दौरे आयोजित करण्यात येऊ नये. तसेच उपरोक्त जिल्ह्यात विधानमंडळ समित्यांचे दौरे/बैठका आयोजित केले असल्यास ते पुढे ढकलण्यात यावेत. तथापि, विधान भवन, मुंबई येथे बैठका घेण्यास हरकत नसावी.

**अत: राज्यात ग्रामपंचयात निवणुकीसंदर्भातील आचारसंहिता लागू झालेली असल्याने आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी सदर टिप्पणी व निवडणूक आयोगाचे पत्र सर्व अधिकारी व समिति कक्षांना वितरित करण्यात यावे.**

**सहायक कक्ष अधिकारी** 25/11/21

**कक्ष अधिकारी (श्री.गायकर)** 25/11/2021

**अवर सचिव (समिति) (श्रीमती तांबे)** तांबे 25/11/2021

**उप सचिव (श्री.आठवले)** Athawale 25/11/2021

**मा.प्रधान सचिव**

निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोट निवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८/११/२०२१

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून),

विषय :- निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १७/११/२०२१ चे पोटनिवडणूक कार्यक्रम आदेश

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक १७/११/२०२१ आदेशान्वये निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम दिलेला आहे.

या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक ३०/११/२०२१ (मंगळवार) ते दिनांक ०६/१२/२०२१ (सोमवार) असा आहे. तरी दिनांक ०४/१२/२०२१ व दिनांक ०५/१२/२०२१ या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येऊ नयेत. याबाबतच्या सूचना सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात व यांस विस्तृत प्रसिध्दी द्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्तच्या आदेशानुसार

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोट निवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/११/२०२१

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून),

विषय :- निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०८/११/२०२१ चे मतदार यादी कार्यक्रम आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण ,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आयोगाच्या समक्रमांकाच्या संदर्भाधीन दिनांक ०८/११/२०२१ च्या आदेशान्वये निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूका घेण्यासाठी दिनांक १२/११/२०२१ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द केली असून दिनांक १८/११/२०२१ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९८०/२०१९ मध्ये दिनांक ४ मार्च २०२१ चे आदेश, मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे रिट याचिका क्र.८८२६/२०२१ मध्ये दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी दिलेले आदेश तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ११७४४/२०२१ च्या अंतिम निकालाच्या अधिन राहून तसेच आयोगाने दिनांक १५/१२/२०२० व दिनांक १३/०१/२०२१ रोजी कोविड १९ च्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करुन, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, दिनांक १८/०२/२०२१ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द होणाऱ्या

...... बाबींची पूर्तता करणाऱ्या ग्रामपंचायतींमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणूक कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.

आदेश

१. १. ज्या ग्रामपंचायतीमध्ये कोवीड ॲक्टीव्ह रुग्ण संख्या नगण्य आहे.

२. ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपण्यास सहा महिन्याचा पेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे.

२. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागा भरण्यापूर्वी त्या ग्रामपंचायतीचे एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेत ठेवावे आणि नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे एकूण आरक्षण २७ % पर्यंत ठेवावे. या आरक्षण मर्यादेची अंमलबजावणी करताना सदस्य संख्येची गणना खालील तक्त्यानुसार करण्यात यावी.

| ग्रामपंचायत सदस्य संख्या | एकूण सदस्य संख्येचे ५०% | एकूण आरक्षण ५०% च्या मर्यादेत (अपूर्णांक दुर्लक्षित करावा) | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग जागा (सदस्य संख्येच्या २७%) | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी देय सदस्य संख्या (अपूर्णांक दुर्लक्षित करावा) |
|---|---|---|---|---|
| ७ | ३.५ | ३ | १.८९ | १ |
| ९ | ४.५ | ४ | २.४३ | २ |
| ११ | ५.५ | ५ | २.९७ | २ |
| १३ | ६.५ | ६ | ३.५१ | ३ |
| १५ | ७.५ | ७ | ४.०५ | ४ |
| १७ | ८.५ | ८ | ४.५९ | ४ |

नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची अतिरिक्त ठरलेली रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमध्ये दिनांक २२/११/२०२१ पर्यंत सुधारणा करण्यात यावी.

तसेच नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या अतिरिक्त ठरणाऱ्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाला दिल्यानंतर महिलांसाठी आरक्षित जागांची संख्या ५०% (एकूण सदस्य संख्येच्या) राखली जाईल याची दक्षता घ्यावी.

३. ३.१ परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार परिशिष्ट ब मध्ये दर्शविलेल्या ग्रामपंचायतींसाठी पोटनिवडणुका घेण्यात याव्यात.

३.२. निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये, निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा मंत्री, खासदार, आमदार व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकाऱ्यांना आचारसंहिता कालावधीत कुठेही करता येणार नाही. (आयोगाचे आचारसंहितेबाबतचे दि. १४/१०/२०१६ चे एकत्रित आदेश, दि. ०६/०९/२०१७ चे अतिरिक्त आदेश व दिनांक १७/१२/२०२० चे पत्र)

३.३ या निवडणुकांसाठी नामनिर्देशनाची प्रक्रिया पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावी.

३.४ सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, दिनांक ११ मार्च २०२० अन्वये जात वैधताप्रमाणपत्र सादर करण्याचे हमी देण्याचा मुभा कालावधी संपुष्टात आल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम सन १९५९ चा अधिनियम क्र.३ च्या कलम १०-अ मधील तरतुदीनुसार नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.५ परिशिष्ट अ येथील निवडणुक कार्यक्रमानुसार मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अशी असेल.

३.६ निवडणूक कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींच्या निवडणूकी संदर्भात न्यायालयाचे किंवा विभागीय आयुक्त (अपीलासंदर्भात) यांच्या स्तरावरुन देण्यात आलेले स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. याबाबतची जबाबादारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.

३.७ ग्रामपंचायतींची निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी पध्दतीने पार पाडण्याच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या पूर्वतयारी आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३.८ नवीनतम उपक्रम राबविण्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३.९ आयोगाने दिनांक १५/१२/२०२० व दिनांक १३/०१/२०२१ रोजी कोवीड १९ संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी क्रमांक ( ग्रा.पं. शाखा) | ०२२-२२८४६७२० |
| दूरध्वनी क्रमांक (संगणकीकरण शाखा) | ०२२-२२८८६९५० |
| ई-मेल | sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

सोबत - परिशिष्ट - अ व परिशिष्ट ब

आपला,

( किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.
६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी
७. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८.संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४
यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.
९. पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य
१०. सचिव, ...

( क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०१/का.०८, दिनांक १७/११/२०२१ च्या आदेशासोबतचे सहपत्र )

**परिशिष्ट अ**

**ग्रामपंचायतीतील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांकरिता पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची अतिरिक्त ठरलेली रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्याचा दिनांक | दिनांक २२/११/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| २ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २२/११/२०२१ (सोमवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ३०/११/२०२१ (मंगळवार) ते दिनांक ०६/१२/२०२१ (सोमवार) वेळ सकाळी ११.०० ते दु . ३.०० |
| ४ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ०७/१२/२०२१ (मंगळवार ) वेळ सकाळी ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ५ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी ) | दिनांक ०९/१२/२०२१ ( गुरुवार ) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०९/१२/२०२१ ( गुरुवार ) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक २१/१२/२०२१ (मंगळवार) सकाळी ७.३० वा. पासून ते सायं ५.३० वा. पर्यंत (गडचिरोली जिल्ह्यासाठी सकाळी ७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत) |
| ८ | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक २२/१२/२०२१ (बुधवार) |
| ९ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २७/१२/२०२१ (सोमवार) पर्यंत |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०१/का.०८, दिनांक १७/११/२०२१ च्या आदेशासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट ब

### रिक्त पदांच्या पोटनिवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार तपशिल

| अ.क्र. | जिल्हा | पोटनिवडणूका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या | रिक्त जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ५५ | १६६ |
| २ | पालघर | ४६ | ९६ |
| ३ | रायगड | १८२ | २८५ |
| ४ | रत्नागिरी | १८७ | २७५ |
| ५ | सिंधुदुर्ग | १२६ | १७१ |
| ६ | नाशिक | २३० | ३९४ |
| ७ | धुळे | ७६ | ९५ |
| ८ | जळगांव | १६२ | २२९ |
| ९ | अहमदनगर | १९२ | २७४ |
| १० | नंदुरबार | ४५ | ५७ |
| ११ | पुणे | ३१७ | ५०३ |
| १२ | सोलापूर | १४८ | १७५ |
| १३ | सातारा | ४५२ | ७९२ |
| १४ | सांगली | ११६ | १६० |
| १५ | कोल्हापूर | १३९ | १९४ |
| १६ | औरंगाबाद | १२८ | १८५ |
| १७ | बीड | १२३ | १८१ |
| १८ | नांदेड | १९८ | ३०१ |
| १९ | उस्मानाबाद | ११९ | १७९ |
| २० | परभणी | ५३ | ६६ |
| २१ | जालना | ७० | ८३ |
| २२ | लातूर | १२७ | २०२ |
| २३ | हिंगोली | ४५ | ५२ |
| २४ | अमरावती | १०३ | १४३ |
| २५ | अकोला | १९८ | ३९८ |
| २६ | यवतमाळ | १२६ | २०० |
| २७ | बुलडाणा | १२३ | १६६ |
| २८ | वाशिम | ११८ | १८९ |
| २९ | नागपूर | ९० | ११६ |
| ३० | वर्धा | ६२ | ८३ |
| ३१ | चंद्रपूर | ९९ | १७३ |
| ३२ | भंडारा | ६५ | १०० |
| ३३ | गोंदिया | ६५ | ९५ |
| ३४ | गडचिरोली | १७२ | ३५१ |
| | एकूण | ४५५४ | ७१३० |